# सज्जनशक्तीला आवाहन

## प्रसंग - 'आजची समाजरचना – तिचे स्वरुप आणि पुनर्बांधणी' या स्वलिखित पुस्तकाचे प्रकाशन

*दि.१८-०३-२००१, स्थळ - जेडीसीसी बँक सभागृह, जळगाव*

*समाजाच्या दृष्टीने उद्योगपती असलेल्या माणसाने समाजालाच वास्तवाची जाणीव करुन द्यावी का? सामान्य माणूस, पुरवठादार, ग्राहक, अर्थतज्ज्ञ, राजकारणी इ. वेगवेगळ्या रुपात समाज संपर्कात येतो. सोबत कडू गोड अनुभव येतात. हवे तसे का घडत नाही आणि ते घडण्यासाठी काय केले पाहिजे याचा विचार होतो. त्याला शब्दरुप मिळते. ते ग्रंथालीला भावते. पुस्तकाचे प्रकाशन होते. पुस्तकाचे लेखक आहेत, श्री. भवरलाल जैन. ते समाजातील सगळ्या सज्जनांना स्वतःचा 'अहम्' बाजूला ठेऊन एकत्र येण्याचे आवाहन करतात.*

खऱ्या अर्थाने व्यासपीठ असलेले हे व्यासपीठ. हे व्यासपीठ विविधरंगी, पण सुशोभित आहे. सुशोभित कसे? तर कुमार केतकरांचा चेहरा मूळ साम्यवादी विचारांचा. गांगलांचा चेहरा समतावादी, समाजवादाचा. माझा चेहरा भांडवलशाहीचा आहे. किती चांगला योग आला? एका व्यासपीठावर हे एकत्र येऊ शकतात. मग कुमारजी, सज्जनशक्ती एकत्र येऊ शकणार नाही असे कसे म्हणू शकता?

पहिली गोष्ट म्हणजे एका भांडवलदाराने हे पुस्तक लिहिले. त्यामुळे आपण निषेध नोंदविला पाहिजे होता. उलटपक्षी आपण या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहिलात, याचा मला आनंद आहे.

दुसरी एक गोष्ट की, माझ्या मित्राने विचारले की, 'प्रकाशनार्थ हे पुस्तक ग्रंथालीला का देऊ नये?' 'ग्रंथाली'बद्दल मला माहिती होती. 'ग्रंथाली'च्या एका समितीवर न विचारता मोठ्या मनाने मला पाचारणही केले होते. मी स्वीकारलेही होते. 'ग्रंथाली' ला प्रकाशनार्थ पुस्तक देण्यास माझी हरकत नव्हती. परंतु त्यांच्या अटींमध्ये मी बसतो किंवा नाही, याबद्दल मला शंका होती. मी हस्ते-परहस्ते हे काम व्हावे, अशी माझी इच्छा होती. त्यानंतर गांगल म्हणाले, 'भवरलालजींना मला भेटायला पाहिजे.' भेटले आणि पुस्तक प्रकाशित होत आहे.

आपल्या समाजात अनेक चेहऱ्यांचे, अनेक विचारांचे लोक आहेत. अनेक पद्धतीने ज्याचा-त्याचा प्रवास सुरु आहे. एका कारणासाठी आपण एकत्र येऊ शकतो. आपली मते विभिन्न असू शकतात. परंतु आपण येथे एकत्र आलो आहोत. कुमार केतकर येथे आहेत. धीरुभाई अंबानींजवळ जे पाच वर्षे राहिले, ते दातार साहेब येथे आलेले आहेत. हा सगळा मेळ कसा बसेल? हा माझ्या मनात प्रश्न होता. मी जे विचार मांडले आहेत, ते पोटतिडकीने मांडले आहेत. बऱ्याच वेळा हे विचार टोकाचे आहेत, असे वाटण्याचीसुद्धा शक्यता नाकारता येत नाही. एखाद्याने हे विचार अतिरेकी, अतिरंजित म्हटले आणि त्याला 'ते योग्य आहेत' असे पालुपद जोडले, तरी माझी काही हरकत नाही.

तीन वक्त्यांनी येथे एक विचार मांडला की, शिक्षणाबद्दल मी फार कमी लिहिले आहे. ते खरे आहे, परंतु यापेक्षा जास्त महत्त्वाचे आहे, काय लिहिले आहे हे! आपल्या घटनेत शिक्षणाला मार्गदर्शक तत्त्वांमधे टाकले आहे. ते शासनावर बंधनकारक नाही, शासनासाठी ते फक्त मार्गदर्शक तत्त्व आहे. शासन तसे वागले नाही, तर न्यायालयात जाता येत नाही. जरी गेलात तरी फारसे काही घडू शकणार नाही. आपल्या या घटनेत मूलभूत हक्कांमध्ये शिक्षणाच्या अधिकाराचा अंतर्भाव करण्यात यावा. कारण इतर प्रगत देशांच्या तुलनेत आपल्याकडे साक्षरतेचे प्रमाण फार कमी आहे. याची वेदना माझ्या मनात आहे. शिक्षणाबरोबरच उच्चशिक्षण असावे की प्राथमिक शिक्षणाला प्राथमिकता द्यावी? हाही महत्त्वाचा मुद्दा आहे. आताच कुलगुरुंनी सांगितले की, आपल्याला क्षेपणास्त्रे किंवा अवकाश असे उच्च तंत्रज्ञान हस्तगत करायचे असेल आणि जर उच्चशिक्षण देऊ शकला नाहीत तर हा देश मागे पडेल.

कुलगुरुंच्या या मताशी मी पूर्णपणे सहमत आहे. मला त्यांना असा मुद्दा सांगावयाचा आहे की, सर, अस्तित्व टिकवायचे असेल, या प्रजासत्ताकाला अर्थ प्राप्त करून द्यायचा असेल तर इथला माणूस किमानपक्षी साक्षर असला पाहिजे, ही प्राथमिक गरज आहे. तो जर शिक्षित झाला तर त्याला ते विचार तपासून पाहण्याची, प्रयोग करण्याची आणि पचविण्याची शक्ती तरी कमीत कमी प्राप्त होईल. आज अंधश्रद्धा, व्यक्तिपूजा या गोष्टींवर, जाती-धर्मावर आपल्या जनतेचा जेवढा विश्वास आहे, तेवढा अन्य कोणत्याही गोष्टींवर विश्वास नाही. असे का घडते? याचे कारण हे आहे की, आपल्याला मुळात मुद्देच समजत नाहीत. ते मुद्दे न समजल्यामुळे इतर कशाचा तरी आधार घेऊन आपण पुढे जात असतो. सगळेच शिक्षण आपण देऊ शकलो तर फार उत्तम आहे. तांत्रिक आणि कृषिशिक्षण यांना

घटनेत मूलभूत हक्काचे स्वरूप प्राप्त व्हावे. त्याला कमीत कमी अमुक इतके टक्के रकमेची तरतूद अर्थसंकल्पात नेहमीसाठी करण्यात यावी हा विचार पहिल्यांदाच मांडण्यात येत आहे. हे आजपर्यंत कुणी मांडल्याचे मला तरी माहीत नाही.

क्षेपणास्त्र नसतानासुद्धा मोगलांनी आपल्यावर ८०० वर्षे राज्य केले. इंग्रजांनीसुद्धा १९० वर्षे राज्य केले. त्यावेळी आपल्याजवळ काहीही नव्हते. जर आपल्याकडे शिक्षण नसेल तर परत हे लोक आपल्यावर राज्य करतील. दुसऱ्या पद्धतीने ते राज्य करतील, अशी भीती आहे. म्हणून किमान प्राथमिक शिक्षणाला तरी मूलभूत हक्कांमध्ये सहभागी करून घेण्यात यावे असे माझे मत आहे.

कुमार केतकरांच्या एकूण भाषणात निराशेचा सूर होता. भारतीय मानसिकता कशी आहे? त्यामुळे मोठी उलथापालथ किंवा क्रांती घडली नाही किंवा घडू शकत नाही. सकृत्‌दर्शनी त्यांच्या मताला कुणी विरोध करावा, हा भाग नाही. कारण त्यांनी ऐतिहासिक दाखले देऊनच आपले मत मांडले आहे. ते वस्तुस्थितीला धरून आहेत, पण भूतकाळात घडले ते पुढेही घडेल, हा युक्तिवाद मात्र नकारात्मक वाटतो. मला नाही वाटत, ते परत घडेल. आपल्या देशाला जर स्वतंत्र ठेवायचे असेल, तर चक्रव्यूहात गोल गोल फिरणाऱ्या अभिमन्यूरूपी समाजाला बाहेर काढले पाहिजे. काही वक्त्यांनी त्याबद्दल मत व्यक्त केले आहे. अभिमन्यूचा वध त्या चक्रव्यूहात झाला तसा समाजाचा वध होईल? असे काही मी माझ्या लेखनात ध्वनित केलेले नाही. परंतु मला एक सांगावेसे वाटते की, अभिमन्यूवर जे संस्कार आणि शिक्षण झाले होते ते तो पोटात असतानाच मिळाले होते. या चक्रव्यूहातून बाहेर कसे पडावे याबद्दल तो प्रशिक्षितच नव्हता. आपण तर समाज प्रबोधनबद्दल बोलत आहोत.

पन्नास वर्षांनंतर तरी आपल्याला कळायला पाहिजे की, यातून बाहेर कसे पडायचे. हा चक्रव्यूह आपण निर्माण केला आहे. त्यासाठी आपणच जबाबदार आहोत. इतर कुणालाही त्यासाठी जबाबदार ठरवू नका. आपण समाजाला बाहेर काढू शकतो, आपण काढत नाही. असे प्रत्येकाने ठरवावे की, जिथे जिथे सज्जन माणूस दिसेल, तिथे तिथे चाकोरीबाहेर जाऊनसुद्धा मी त्याला मदत करीन. माझ्या जीवनाचे तर ध्येय आहे की जिथे जिथे अशी माणसे भेटतील त्यांना मी मदत करीन. सज्जनशक्तीमध्ये एवढी ताकद आहे आणि असू शकते. मला आपल्याला असे सांगायचे आहे, की कसेही झाले तरी मला हा मुद्दा रेटून न्यायचा आहे. कारण तो जनहिताचा मुद्दा आहे.

सज्जनशक्तीचा अहं कुमारांनी जो स्पष्ट केला, त्याचा माझ्या समोर जे काही सज्जन

लोक आहेत त्यांचे वर्णन केले तर खूप वेळ लागेल शेवटी वेळेचे भान ठेवलेले आहे. जसे बाबासाहेब पुरंदरेंचे शिवचरित्र सांगतांना होते तसे माझ्या या पुस्तकाविषयी होईल. त्याचे कारण असे आहे की, हे पुस्तक लिहिताना, विचार करायला मला दोन वर्षे लागली. कधी दोन पाने लिहिली, कधी सात पाने लिहिली. त्यामुळे त्यात तुटकपणादेखील आढळेल. सलग लिहिलेले नाही. त्यामुळे मी प्रबंधासारखे मुद्देच दिले आहेत. ज्याप्रमाणे एखाद्या प्रकल्प अहवालाची मांडणी होते, त्याप्रमाणे स्वच्छ मांडणी करण्याचा प्रयत्न मी केला आहे.

मित्रांनो, आपल्या 'अहं'ला बाजूला ठेवणे सगळ्यात जास्त कठीण काम आहे. जगात जे मोठमोठे लोक झाले त्यांना दोन्ही अर्थाने चांगला आणि वाईट 'अहं' होताच. हिटलरला त्याच्या प्रकारचा 'अहं' होता आणि गांधीजींना त्यांच्या प्रकारचा 'अहं' होता. आपल्याला वाईट वाटेल, मी गांधीजींना 'अहं' होता असे म्हणतोय. 'अहं' शिवाय माणसाच्या जीवनाला दिशा मिळत नाही. 'अहम्' असावा, परंतु तो दुसऱ्याला त्रासदायक ठरेल असा नसावा. 'अहं' असला तर त्याच्या जोडीला त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आपल्यात विवेक यावा. असे संस्कार आपल्याला मिळावेत ही अपेक्षा आहे. ही अपेक्षाम्हणजे फारच मोठी अपेक्षा आहे असे मला वाटत नाही.

जस जसे माणसाला समजत जाते तसतसा तो जास्त विनयशील होत असतो. आपण जर स्वत:ला सज्जन समजत असाल तर आपल्याला जे माहीत आहे त्यापेक्षा माहिती नसण्याचे प्रमाण अधिक आहे. अहंकार सोडणे ही बाब कठीण असली तरी सज्जनशक्तीला अप्रत्यक्ष वा प्रत्यक्षरित्या मदत करणार असेल तर तेवढी कसरत करायला शिकलेच पाहिजे. 'तो तत्त्वाचा विषय आहे,' म्हणून दरवाजे खिडक्या बंद करणे फार झाले. **तत्त्वाचा विषय असला तरी त्याला व्यवहाराची जोड द्याल की नाही? तत्त्व, व्यवहार आणि कायदा यांचा कुठेतरी संगम आणि समन्वय साधता आला पाहिजे.** ते पैलू परस्पर विरोधी असतातच असे नाही. असू शकतात ही शक्यता आहे.

आज नाही तर उद्या ही सज्जनशक्ती जागृत होणार आहे. याचे कारण समाजचित्र पार बिघडले आहे. ही जी दुसरी शक्ती आहे ती यांच्या उघड अन्यायाने, नागड्या प्रदर्शनाने या सज्जनशक्तीला ललकारणार आहे. 'अरे तुम्ही काय करू शकताय? आमच्यापुढे आहात काय तुम्ही?' आज जवळपास असेच सुरू झाले आहे. आज प्रत्येक गोष्टीला दांडगी शक्ती आव्हान देत आहे. आपण मनावर घेणं महत्त्वाचे आहे, कठीण काहीच नसते!

मी हे पुस्तक लिहिले, त्या वेळी असे वाटले नव्हते की, इतक्या तोलामोलाच्या व्यक्ती त्याचे मूल्यमापन करतील. ही चळवळ जोर धरण्यासाठी आपल्या प्रत्येकाची मदत हवी आहे. त्यासाठी वर्गणी देण्याची गरज नाही. समाजात जो जो चांगले काम करीत असेल तो माणूस माझा भाऊ, मित्र आहे असे समजण्याची गरज आहे. जमेल तेवढे करु शकत असू, तर या पुस्तकाचा हेतू साध्य झाला असे समजेल!

आपणा सर्वांचे आभार मानून, थांबतो.

जय हिन्द! जय महाराष्ट्र!



F:\Bhashan\Bhashane 4 book\bhashane Book1_1-28